महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन( अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक: एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २६ फेब्रुवारी, २०१४

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१३/६०४५४/१५-क(५)/१२०१९, दिनांक २४ डिसेंबर, २०१३.

प्रस्तावना -

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकरिता दिनांक ०८ ऑगस्ट,२०१३ पर्यंत अर्ज मागविण्यात

Renuka Bhosale

OFFICIATING HEAD MISTRESS
NEW INDIA SCHOOL-PRIMARY
RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE 38

आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ३७०० प्रस्तावांपैकी खालीलप्रमाणे एकूण २२१७ प्रस्तावांना याद्वारे शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | वर्गीकरण | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव | एकूण प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | १८०४ | १३२५ | ३१२९ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ४१३ | १५८ | ५७१ |
| एकूण | | २२१७ | १४८३ | ३७०० |

**१.१ नवीन शाळा परवानगी व शाळांचा दर्जावाढ** – या सोबतच्या **विवरणपत्र- अ** मध्ये दर्शविलेल्या शाळांना, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन **परवानगी** देत आहे.

**१.२.अपात्र शाळा**– नवीन शाळा स्थापन करणे किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे यासाठी अपात्र ठरलेल्या प्रस्तोवांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य-सचिवांकडून संबंधित अर्जदार संस्थेला वैयक्तिरित्या कळविण्यात येईल .

२. **शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती** -

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे **आवश्यक आहे.**

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळांच्या व्यवस्थापनांनी **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे **परवानगी** देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

Renuka Bhosle

OFFICIATING HEAD MISTRESS
NEW INDIA SCHOOL-PRIMARY
RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE-38

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१४-१५ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे, अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

क) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी** (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या **विवरणपत्रांतील** यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळांना

i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच,

ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

२.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा**- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,

Renuka Bhosale

OFFICIATING HEAD MISTRESS
NEW INDIA SCHOOL-PRIMARY
RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE-38.

"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२२८११२४०१९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2014.03.01 11:46:12 +05'30'

(रा.ग.गुंजाळ)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. विभागांतर्गत सर्व संचालक.
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

Renuka Bhosale

OFFICIATING HEAD MISTRESS
NEW INDIA SCHOOL-PRIMARY
RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE-38.

१२.संबंधित प्रशासन अधिकारी, महानगर पालिका/नगर परिषद/नगर पालिका

प्रत माहितीसाठी अग्रेषित :-

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

२. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

३. मा. मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

४. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

५. निवडनस्ती (एसएम २).

Remuka Bhosale

OFFICIATING HEAD MISTRESS
NEW INDIA SCHOOL-PRIMARY
RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE-38.

शासन निर्णय क्र. एसएफएस-1114/प्र.क्र. 40/एसएम- 2, दिनांक 26 फेब्रुवारी 2014 चे सहपत्र

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 265 | पुणे | विद्यासंस्कार प्रतिष्ठान, जुन्नर, जि.पुणे | विद्या इंटरनॅशनल स्कूल, बल्लाळवाडी, ता. जुन्नर जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 266 | पुणे | जयमल्हार रुरल डेव्हलपमेंट अँड एज्युकेशन सोसायटी, लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा | ॲसेंड इंटरनॅशनल स्कूल, निरा पिंपरे, ता.पुरंदर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 267 | पुणे | राजा श्री शिवराय प्रतिष्ठान, कोथरुड, पुणे | आरएसएसपी इंग्लिश मिडीयम प्रायमरी स्कूल, स.नं.121/122, रामबाग कॉलनी, पौड रोड, कोथरुड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 268 | पुणे | विद्याधन एज्युकेशन सोसायटी, नेताजी नगर, पिंपळे गुरव, पुणे | जिज्ञासा नॅशनल स्कूल, 797, मु.पो. केंजळ, ता.भोर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 269 | पुणे | रयत शिक्षण संस्था, सातारा | मयुर इंग्लिश मिडीयम स्कूल, शेटफळगढे, ता. इंदापूर जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 270 | पुणे | रयत शिक्षण संस्था, सातारा | इंग्लिश मेडीयम स्कूल, वडगाव खुर्द, सनसनगर, पुणे-41 | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 271 | पुणे | सरस्वती शिक्षण मंडळ, देवतानगर, जळोची, ता.बारामती, जि.पुणे | सिध्दीविनायक मराठी मिडीयम स्कूल, जळगांव सुपे, ता.बारामती, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| 272 | पुणे | श्री. केशवराज शिक्षण संस्था, मरकळ, ता.खेड, जि.पुणे | पवनसूत इंग्लिश मिडीयम स्कूल, मरकळ, ता.खेड, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 273 | पुणे | क्रिस्टल हाऊस लवासा, विक्रोळी वेस्ट, मुंबई | क्रिस्टल हाऊस लवासा स्कूल, प्लॉट नं.196, हील व्हयू स्ट्रीट, दासवे, ता.मुळशी, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 274 | पुणे | क्रिएटीव्ह एज्युकेशनल सोसायटी, , चिंचवड स्टेशन जवळ, पुणे | क्रिएटीव्ह पब्लिक स्कूल (सी.बी.एस.ई.) इंग्लिश मिडीयम स्कूल, पंचजन्य से.नं.29, प्लॉट नं.12, स.नं 125, आकुर्डी स्टेशनजवळ, पुणे-44 | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 275 | पुणे | एकलव्य शैक्षणिक संस्था, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे | विद्यासागर इंग्लिश मिडीयम स्कूल, राजगुरुनगर, डाक बंगला, ता.खेड, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |

Renuka Bhosale

OFFICIATING HEAD MISTRESS
NEW INDIA SCHOOL-PRIMARY
RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE-38.

शिक्षण विभाग (प्राथमिक),
पुणे महानगरपालिका
जा.क./खाप्राशा/९२०/2019–20
दि. ३१६१९

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
राजा श्री शिवराय प्रतिष्ठान संस्था,
न्यु इंडिया स्कूल–प्रायमरी,
स.नं. 121/122, रामबाग कॉलनी,
पौड रोड, कोथरूड, पुणे.

राजा श्री शिवराय प्रतिष्ठान
आवक क्र. ३४९/२०१९–२०२०
दिनांक ०६।०६।२०१९

विषय– शाळेच्या नावातील बदलाबाबत

संदर्भ– मा. शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग यांचेकडील जा.क./शिऊसं/प्राथ–202 2018–19/3870/दि. 31/05/2019 चे आदेश

उपरोक्त संदर्भकीत विषयान्वये आपली संस्था राजा श्री शिवराय प्रतिष्ठान संस्थेची आर.पी.एस. इंग्लिश मिडीयम स्कुल संचलित आर.पी.एस. इंग्लिश मिडीयम स्कुल या शाळेच्या नावाऐवजी न्यु इंडिया स्कुल–प्रायमरी असे करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी राजा श्री शिवराय प्रतिष्ठान संस्थेंची आर.पी.एस. इंग्लिश मिडीयम प्रायमरी स्कुल या शाळेच्या नावाऐवजी **न्यु इंडिया स्कुल–प्रायमरी** अश्या बदलाची नोंद घेवून पुढील आवश्यक कार्यवाही करणेची व्यवस्था करावी.

(शिवाजी दौंडकर)
प्रशासकीय अधिकारी
शिक्षण विभाग प्राथमिक,पुणे मनपा

प्रत– माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी
विभागीय सहा. प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग प्राथमिक,पुणे मनपा
आर.टी.ई. कक्ष, शिक्षण विभाग प्राथमिक,पुणे मनपा
मुख्यांध्यापिका, न्यु इंडिया स्कुल–प्रायमरी, रामबाग कॉलनी, कोथरूड, पुणे

Ronnhe Bhosale

**OFFICIATING HEAD MISTRESS**
**NEW INDIA SCHOOL-PRIMARY**
**RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE-38**

राजा श्री शिवराय प्रतिष्ठान
आवक क्र. 028 2023-2024
दिनांक 6/06/2023

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेल्या परवानगीबाबत...

राजा श्री शिवराय प्रतिष्ठान, कोथरुड, पुणे संचलित न्यु इंडिया स्कुल प्रायमरी, स. नं. १२१/२२, रामबाग कॉलनी, पौड रोड, कोथरुड, पुणे.

NEW INDIA SCHOOL, KOTHRUD - 411038
Inward No. NISP/57/23-24
Section - Pre Primary / Primary primary
Date: 6/6/23
Received By: [signature]

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन शुद्धीपत्र क्रमांकः एसएफएस-१०२३/प्र.क्र.२५६/एसएम-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक: ०५ जून, २०२३

वाचा :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२, दि. २६.०२.२०१४.

शासन शुद्धीपत्र :-

राजा श्री शिवराय प्रतिष्ठान, कोथरुड, पुणे संचलित न्यु इंडिया स्कुल प्रायमरी, स. नं. १२१/२२, रामबाग कॉलनी, पौड रोड, कोथरुड, पुणे या प्राथमिक (इंग्रजी माध्यम) शाळेला शासन निर्णय, क्रं. एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२, दिनांक २६.०२.२०१४ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. उपरोक्त शासन निर्णयामधील शाळेचे नाव **"आरएसएसपी इंग्लिश मिडियम प्रायमरी स्कूल"** ऐवजी **"न्यु इंडिया स्कुल प्रायमरी"** असे वाचावे.

२. सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतच्या संदर्भाधीन दिनांक २६.०२.२०१४ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील.

३. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाच्या आत कळविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

प्र.प्र.पडोळे
(प्रदिप पडोळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७. निवडनस्ती (२५६/२३/एसएम -२).

Remmbu Bhosle
OFFICIATING HEAD MISTRESS
NEW INDIA SCHOOL-PRIMARY
RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE-38

राजा श्री शिवराय प्रतिष्ठान
आवक क्र. ४३८/२०२३-२०२४
दिनांक २६/०८/२०२३

# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com

वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४/ज.रा.कु./शारान शुध्दीपत्र न्यूक्लिअस व स्कू/२०२३ 8531
दिनांक : 25 AUG 2023

**विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी सन २०१४-२०१५ पासून निर्गमित झालेल्या शासन परवानगीचे अनुषंगाने व शाळेचे नांव बदलाबाबत निर्गमित शासन शुध्दीपत्राचे अनुषंगाने निर्गमित करावयाचे आदेश**

वाचा : १.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र एसएफएस-१११४/प्र.क्र. ४०/एसएम-२ दिनांक २६.२.२०१४

२.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मुंबई कडील शासन शुध्दीपत्र क्रमाक : एसएफएस-१०२३/प्र.क्र. २५६/एसएम-२,दिनांक ५.६.२०२३

**शुध्दीपत्र :**

राजा श्री शिवराय प्रतिष्ठान,कोथरुड, पुणे संचलित न्यु इंडिया स्कूल, प्रायमरी,स.नं.१२१/२२, रामबाग कॉलनी, पौड रोड,कोथरुड, पुणे या प्राथमिक (इंग्रजी माध्यम) शाळेस संदर्भ क्र. १ शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,क्रमांक शासन निर्णय क्र एसएफएस-१११४/प्र.क्र. ४०/एसएम-२, दिनांक २६.२.२०१४ अन्वये शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्यांत आली आहे.

उपरोक्त शासन निर्णय संदर्भ क्र. १ मधील शाळेचे नांव **" आरएसएसपी इंग्लिश मिडियम प्रायमरी स्कूल ऐवजी न्यु इंडिया स्कुल प्रायमरी असे वाचावे."** तसेच सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतच्या संदर्भीय क्रमांक १ दिनांक २६.२.२०१४ च्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती जशाच्या तशा सदर शाळेस लागू राहतील. यानुसार संदर्भीय क्रमांक २ नुसार शासन शुध्दीपत्र निर्गमित झालेले आहे.

संदर्भीय क्र. २ च्या शासन शुध्दीपत्राबाबतचे सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसाचे आत कळविण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांची राहील.

(राजेंद्र अहिरे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रति,
अध्यक्ष राजा श्री शिवराय प्रतिष्ठान, बाबूराव सुतार पथ, रामबाग कॉलनी पौड रोड कोथरुड पुणे-४११०३८.

प्रत : माहितीस्तव रवाना
श्री. विवेक सपकाळ, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२.

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
१. मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
२. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत : माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना
शिक्षणाधिकारी (माध्यमिक/ प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे

Renuka Bhosale
OFFICIATING HEAD MISTRESS
NEW INDIA SCHOOL-PRIMARY
RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE-38.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:-

Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२२/प्र.क्र.१०८२/एसएम-२

दिनांक ०७ मार्च, २०२४

मान्यता पत्र

प्रति,

**अध्यक्ष / सचिव,**

**राजा श्री शिवराय प्रतिष्ठान,**

**रामबाग कॉलनी, पौंड रोड, कोथरूड, पुणे.**

विषय- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र

**राजा श्री शिवराय प्रतिष्ठान, रामबाग कॉलनी, पौड रोड, पुणे संचलित न्यू इंडिया स्कूल, भूमापन क्र.८६०, (प्रायमरी सर्व्हे नं.१२१/१२२), रामबाग कॉलनी, पौड रोड, पुणे**

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२२/प्र.क्र.१०८२/एसएम-२, दिनांक २४/०१/२०२३

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **राजा श्री शिवराय प्रतिष्ठान, रामबाग कॉलनी, पौड रोड, पुणे संचलित न्यू इंडिया स्कूल, भूमापन क्र.८६० (प्रायमरी सर्व्हे नं.१२१/१२२), रामबाग कॉलनी, पौड रोड, पुणे या प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते माध्यमिक (इ.६ वी ते इ.१० वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरीता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून **राजा श्री शिवराय प्रतिष्ठान, रामबाग कॉलनी, पौड रोड, पुणे संचलित न्यू इंडिया स्कूल, भूमापन क्र.८६० (प्रायमरी सर्व्हे नं.१२१/१२२), रामबाग कॉलनी, पौड रोड, पुणे या प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते माध्यमिक (इ.६ वी ते इ.१० वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ करण्याकरीता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. सदर शाळेस आता पुढील अटीं व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून दर्जावाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या

Renuka Bhosale

OFFICIATING HEAD MISTRESS
NEW INDIA SCHOOL-PRIMARY
RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE-38.

(116)

अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(विवेक सपकाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
६. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)(१०८२/२०२२)

Renuka Bhosale
OFFICIATING HEAD MISTRESS
NEW INDIA SCHOOL-PRIMARY
RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE-38.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
Email ID :- sm2.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२२/प्र.क्र.१०८२/एसएम-२ दिनांक :- २४ जानेवारी, २०२३

**इरादा पत्र**

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
राजा श्री शिवराय प्रतिष्ठाण,
रामबाग कॉलनी, पौड रोड, कोथरुड, पुणे.

विषय:- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी इरादापत्र...

राजा श्री शिवराय प्रतिष्ठाण, पुणे संचलित न्यू इंडिया स्कुल, नगर भुमापन क्र. ८६०, प्रायमरी सर्व्हे नं. १२१/१२२, रामबाग कॉलनी, पौंड रोड, पुणे.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत राजा श्री शिवराय प्रतिष्ठाण, पुणे या संस्थेने सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासुन न्यू इंडिया स्कुल, रामबाग कॉलनी, पौंड रोड, पुणे या प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते माध्यमिक ( इ. ६ वी ते १० वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ मान्यतेकरीता अर्ज सादर केला होता.

२. वर नमुद केलेल्या विषयावरील आपल्या अर्जाच्या संदर्भात, आपणांस असे कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राजा श्री शिवराय प्रतिष्ठाण, पुणे संचलित न्यू इंडिया स्कुल, नगर भुमापन क्र. ८६०, प्रायमरी सर्व्हे नं. १२१/१२२, रामबाग कॉलनी, पौंड रोड, पुणे या प्राथमिक शाळेला जोडून उच्च प्राथमिक ते माध्यमिक ( इ. ६ वी ते १० वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर दर्जावाढ मान्यतेकरीता शाळेचे काम सुरु करण्यास पुढील अटीं व शर्तीसह इरादा पत्र देण्यात येत आहे.

SECRETARY
Raja Shree Shivraya Pratishthan
Kothrud, Pune-411 038.

३. अटी व शर्ती :-

*(एक)* सदर इरादा पत्र, अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे अनुपालन केल्याशिवाय, मान्यता पत्राची हमी देत नाही.

*(दोन)* सदर इरादा पत्राच्या आधारे, नोंदणीकृत संस्था किंवा न्यास किंवा कंपनीला शाळा/दर्जावाढीचे काम सुरू करता येणार नाही.

*(तीन)* सदर इरादा पत्राचा, सी.बी.एस.ई. / सी.आय.एस.सी.ई. / सी.ए.आय.ई. / आय.बी. इत्यादी मंडळांच्या संलग्नतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र म्हणून वापर करता येणार नाही.

OFFICIATING HEAD MISTRESS
NEW INDIA SCHOOL-PRIMARY
RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE-38

*(चार)* नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ आणि अधिनियमान्वये व नियमांन्वये शासनाने वेळोवेळी दिलेले निदेश, यांमध्ये विहीत केल्याप्रमाणे, इरादा पत्र प्राप्त झाल्यापासून १८ महिन्यांच्या आत, पायाभूत व भौतिक सुविधा (वर्गखोल्या, प्रसाधनगृहे, पेयजल सुविधा, प्राचार्य व कर्मचारी वर्ग कक्ष, ग्रंथालय, प्रयोगशाळा, इत्यादींसारख्या) याबाबतची मानके, अटी व शर्ती यांचे अनुपालन करणे अनिवार्य असेल.

*(पाच)* वर नमूद केलेल्या सुविधांचे अनुपालन केल्यानंतर, इरादा पत्र प्राप्त झाल्यापासून १८ महिन्यांच्या आत, संबंधित जिल्ह्याच्या क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाकडे मान्यता पत्रासाठी अर्ज सादर करणे, ही संस्थेची किंवा न्यासाची किंवा कंपनीची जबाबदारी असेल.

*(सहा)* जर १८ महिन्यांच्या आत, मान्यता पत्रासाठी अर्ज सादर करण्यात शाळा व्यवस्थापन अपयशी ठरत असेल तर, इरादा पत्र रद्द होईल. इरादा पत्राचा कालावधी, कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाऊ शकणार नाही.

*(सात)* इरादा पत्र दिल्यानंतर, प्रस्तावित शाळेचे ठिकाण बदलता येणार नाही. जर व्यवस्थापनाने, शासनाने मंजूर केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणच्या मान्यता पत्रासाठी अर्ज केला असेल तर, इरादा पत्र रद्द होईल.

*(आठ)* या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरून, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले इरादा पत्र रद्द करू शकेल.

*(नऊ)* सदर संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्राकरीता अर्ज करताना अद्ययावत आरटीई नमुना-२ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

*(दहा)* सदर संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने अधिनियमाच्या "अनुसूची ग" मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम व्यवस्थापन आणि संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या नावे संयुक्तरित्या, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरुपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेतील मुदत ठेवीच्या स्वरुपात ठेवणे आवश्यक राहील.

(समीर सावंत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) विभागीय शिक्षण उप संचालक, पुणे विभाग, पुणे.
५) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
६) निवड नस्ती- (एसएम-२/१०८२/२२).

Remha Bhosale
**OFFICIATING HEAD MISTRESS**
**NEW INDIA SCHOOL-PRIMARY**
**RAMBAUG COLONY, KOTHRUD, PUNE-38**